**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** वडुज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0191 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/07/2025 22:53

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 21/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/07/2025
**Time From (वेळेपासून):** 12:42 बजे
**Time To (वेळेपर्गत):** 12:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/07/2025 **Time (वेळ):** 22:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/07/2025 22:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वडुज,खटाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** वडुज
**District(State) (जिल्हा(राज्य)):** सातारा(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मुख्तार मकबुल बागवान

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पुसेसावळी ,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पुसेसावळी ,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9175504788

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शरण देविसिंग पावरा | | | 1. डंगारे पेट्रॉलपंपाशेजारी, शिवाजीनगर ,दहिवडी ,माण, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/रक्कम | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 21/07/2025

मी मुख्तार मकबुल बागवान वय 52 वर्षे, व्यवसाय - भाजी विक्री, रा. पुसेसावळी ता.खटाव जि.सातारा मोनं - 9175504788

मी दि. 21/07/2025 रोजी सकाळी 08.37 वा. अॅन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथील पोलीस निरीक्षक सचिन अंकुश राऊत यांना मोबाईल व्दारे फोन करुन माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली व मला सातारा येथे येणे शक्य नसल्याचे सांगीतले. तेव्हा पोलीस निरीक्षक सचिन राऊत यांनी वडुज येथे येवुन पुढील कारवाई करणार असल्याचे सांगुन मला वडुज पुसेगाव रोडवरील दिवाणी व फौजदारी कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत येवुन थांबण्यास सांगीतले. त्यानुसार मी तेथे येवुन थांबलो.

त्या नियोजनानुसार आज दि. 21/07/2025 रोजी 10.30 वा.चे सुमारास वडुज पुसेगाव रोडवरील दिवाणी व फौजदारी कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत मी हजर असताना पोलीस निरीक्षक सचिन राऊत हे शासकीय वाहनातुन येवुन माझ्या जवळ येवुन थांबले. त्यावेळी त्यांनी माझी ओळख करुन घेऊन त्यांचे सोबत असलेले रहिमतपुर नगरपरिषद येथील किशोर बबन कुदळे, लिपीक व राजकुमार चंद्रकांत माने,स्वच्छता निरीक्षक या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा ताटे, पोशि देशमुख, थोरात यांची आम्हाला एकमेकांना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून मी माझी पत्नी फरजाना व दोन मुले यांचे सोबत राहण्यास आहे. मी उदरनिर्वाहासाठी खटाव तालुक्यातील आठवडा बाजारात भाजीपाला विक्रीचे काम करत आहे. माझे शिक्षण 12 वी नापास झालेले आहे.

सन 2017-2018 मध्ये पुसेसावळी गावातील प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेअंतर्गत घरकुलचा सव्र्हे झाला होता. सन 2021-2022 मध्ये प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये माझे पत्नीचे नाव प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून आले. सन 2024-2025 मध्ये पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालय यांचेकडून दिनांक 17/09/2024 रोजी माझ्या पत्नीचे नावे असलेल्या सिटी सव्र्हे नं. 285 मध्ये घरकुल बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळाली व त्यानुसार दिनांक 15/10/2024 रोजी माझ्या पत्नीचे खात्यावर घरकुल अनुदानाचा पहिला हप्ता 15,000/- रु जमा झाला. त्यानंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती, वडुज यांचेकडील 18/02/2025 रोजीचे आदेशाने माझी पत्नी फरजाना मुख्तार बागवान यांचे नावे कार्यारंभ आदेश दिले. त्यानुसार माझे घराचे काम सुरु केले. त्यानंतर दिनांक 05/07/2025 रोजी घरकुल अनुदानाचा दुसरा हप्ता माझे पत्नीचे खात्यावर 70,000 /- रुपये जमा झाला.

त्यानंतर दिनांक 11/07/2025 रोजी पुसेसावळी येथे आमच्या घरकुलच्या पाहणी करिता पंचायत समिती, वडुज येथील विस्तार अधिकारी, पावरा साहेब हे आले. त्यांनी मला पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेचा हप्ता आला का? असे विचारले तेव्हा मी त्यांना दुसरा हप्ता 70,000/- रुपये आला असल्याचे सांगितले. त्यावेळी पावरा साहेब यांनी मला मंजूर झालेल्या अनुदानाच्या दुस-या हप्त्याचे व उर्वरित हप्ते जमा करायचे असेल तर मला 10,000/- रु दयावे लागतील. ते काम माझ्या हातात आहे. असे म्हणून माझ्याकडे 10,000/- रुपयाची मागणी केली. घरकुल अनुदान देण्याचे काम हे पावरा साहेब यांचेकडे असल्याचे मला माहित आहे. मी त्यांना त्यांचे मागणीप्रमाणे पैसे दिले नाहीत तर ते माझे उर्वरित हप्त्यांचे पैसे खात्यावर जमा करण्याचे काम करणार नाहीत म्हणून त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो.

त्यानंतर दिनांक 18/07/2025 रोजी पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालयातील पावरा साहेबांचा मला फोन आला व त्यांनी पैशाबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना अजून पैसे काढले नाहीत. पैसे काढल्यानंतर तुम्हाला भेटतो असे म्हणालो त्यावेळी त्यांनी सोमवार दि. 21/07/2025 रोजी पंचायत समिती कार्यालय, वडुज येथे पैसे

घेवून या असे म्हणाले. त्यावेळी मला पावरा साहेब हे माझ्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल अनुदानाच्या सोडलेल्या 70,000/- रु. चा हप्त्यासाठी तसेच पुढील अनुदानाचा हप्ता सोडणेसाठी माझ्याकडे मागणी करीत असलेले 10,000/- रु ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. ती लाच रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नाही.

मी आज दिनांक 21/07/2025 रोजी पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालयातील पावरा साहेब यांची पंचायत समिती, खटाव (वडुज) येथे जावून त्यांची भेट घेवून त्यांचेशी लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. तरी त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.

माझेत व पंचायत समिती कार्यालय, वडुज येथील पावरा साहेब यांचेत कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत अगर पुर्ववैमनस्य नाही. वगैरे मजकुराची माझे हस्ताक्षरातील तक्रार पोलीस निरीक्षक राऊत यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाचुन बघितली व त्यावर सह्या केल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत यांनी पावरा साहेब, विस्तार अधिकारी, पंचायत समिती वडुज ता.खटाव जि.सातारा यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचांसमक्ष निर्णय घेतला. पंच नंबर 1 म्हणुन किशोर कुदळे व पंच नंबर 2 म्हणुन राजकुमार माने यांनी काम करण्याचे ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला माझेकडे लाच मागणी होत आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे व पंचाचे निवेदन घेवुन माझे शर्टचे आतील बनियानला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर लावून दिले व तेथून 11.20 वाचे सुमारास मला पंच नंबर 1 किशोर कुदळे यांचेसोबत पायी वडुज कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेतुन पंचायत समिती वडुज येथील पावरा साहेब यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक राऊत साहेब व त्यांचे सहकारी वडुज कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 किशोर कुदळे असे पंचायत समिती वडुज येथे गेलो असता प्रधानमंत्री आवास योजना ऑफिसमध्ये माझी व पावरा साहेब यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना "नमस्कार पावरा साहेब" असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब केल का सुरु असे म्हणाले तेव्हा मी बांधकाम केल सुरु असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेबांनी मला फोटो आणले का? असे विचारले. तेव्हा मी त्यांना फोटो नाय आणले... कामगार आलेती... मी म्हटलं.. तुम्ही त्या दिवशी बोलवल होत.. गुरवारी येवुन गेलो..गुरवारी काय आपण असे सांगीतले. त्यावर ते हु. असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी माझ्याशी कामाबाबत चर्चा केली व ते तेथुन उठुन माझ्यासोबत चालत पशुसंवर्धन ऑफिसमध्ये गेले मी ही पंचासोबत त्यांचेबरोबर चालत पशुसंवर्धन विभागातील त्यांचे कक्षात गेलो. तेव्हा पावरा साहेब खुर्चीत बसले मी त्यांचे समोर उभा राहीलो. तेव्हा पावरा साहेब मला फोनवर चर्चा करता येत नाही असे असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना हो फोनवर कशी चर्चा करणार असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना पैशाचा विषय आहे.. आणि पैशाचा विषय फोनवर बोलता येत नाही असे म्हणालो व "ती कस झालवतं.. अं.. तुमच्या सहकार्याने झालय ती काम" असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "दोन्ही हफ्ते आलेती .. तर ती म्हटलं..चर्चा करण्यासाठीच.." असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेबांनी मला "आता किती आणलेती?" असे विचारले तेव्हा मी त्यांना "आत्ता म्हणजे.. तुम्ही म्हटला होता.. चर्चा करायला या.. ती कसय.. आता सत्तर आलेत तुम्हाला त्यातले किती दयायचे?" असे विचारले तेव्हा पावरा साहेब "दहा" म्हणाले. तेव्हा मी त्यांना "दहा दयायचे .. मग आता दहा म्हणजे त्यातले... कमी जास्त करायचे काय.. अँडजस्ट दोन हफ्त्यात देतो की.". असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "चालतय की.. नाय काय अडचन" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आठ दिवसाने देतो बाकीचे काय राहिलेले" असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "चालेल चालेल.. तुमच्या हेच्याने.. आम्ही जबरदस्ती करत नाही.." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मी आहो.. तुम्ही सहकार्य केलय आम्हाला असे म्हणालो. त्यानंतर मी व पावरा साहेब यांनी आपसात माझ्या घराच्या बांधकामाबाबत चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना "आल का लक्षात.. आता ती कसय.. फरजाना मुख्तार बागवान नावाने ते हे ... हाय.. येत आहे की नाय.." असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना लेडीज नावाने येतय त्यामुळ प्रॉब्लेम येतोय.. कुणीकडण तरी अँडजस्ट करुन ..असे म्हणालो व मी तुम्हाला देणार.. तुम्ही हाय ना इथ आज ? असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब हाय की.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना येवु का? गोळा करुन असे म्हणालो तेव्हा त्यांनी हु. चालतय.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "पाच देतोय आज.. पुढच्या आठवडयात पाच देतो.. अन नंतरचे कसे काय करायच.." असे विचारले तेव्हा त्यांनी मला "बघु आपण..तुमच जोपर्यंत घर होत नाही तोपर्यंत मी हाय" असे मला म्हणाले. त्यानंतर मी त्यांचेशी चर्चा करुन "येतो मी" असे म्हणालो. त्यानंतर मी पंच नं 1 चालत वडुज कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत 11.36 वा.चे सुमारास परत आलो.

तेव्हा पो.नि.राऊत साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी

घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोनि राऊत साहेब व पंचांनी माझ्यावडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली की, पावरा साहेब यांनी माझे पत्नीचे नावे असलेल्या घरकुलाचे 70,000/- रुपये मंजुर केलेल्या मोबदल्यात माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व त्याचा पहीला हप्ता म्हणुन 5000/- रुपये लाच रक्कम घेवुन येणेस सांगीतले आहे. तसेच पावरा साहेब यांनी माझ्याकडेस केलेल्या लाच मागणीवेळी पंच नंबर 1 किशोर कुदळे हे माझ्यासोबतच होते व त्यांनी माझी व पावरा साहेब यांचेत झालेली चर्चा एेकली असुन पावरा साहेब यांनी माझ्याकडे केलेली लाच मागणी एेकली आहे. त्यानंतर सापळा कारवाई करण्याचे पंचांचे सहमतीने ठरविण्यात आले.

त्यानंतर मी पोनि राऊत साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 5,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत यांनी दिले सुचनेवरून सहका-यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर पंचानी व राऊत साहेब यांनी सही केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत साहेब व त्यांच्या सहका-यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांचे सुचनेवरून पोशि देशमुख यांनी अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही माझे पँटच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व पावरा साहेब यांना लाच रक्कम दिल्या नंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन इशारा करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे व पंचाचे निवेदन घेवुन व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच आतील बनियानला लावून मला पंच नं 1 यांचे सोबत पंचायत समिती वडुज येथे 12.34 वाचे सुमारास रवाना केले. आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक राऊत साहेब व सापळा पथक व पंच नंबर 2 हे पायी चालत आले. तेव्हा मी पंच नंबर 1 कुदळे यांचे सोबत पंचायत समिती वडुज येथे गेलो तेव्हा पावरा साहेब हे प्रधानमंत्री आवास योजना आफिसमध्ये होते. तेव्हा मी त्यांना "पावरा साहेब कुठ स.ईडला जावुया का?"असे विचारले असता ते तेथुन बाहेर आले. तेव्हा मी त्यांचेसोबत पुन्हा
पशुसंवर्धन ऑफिस कडे जात असताना पंच नंबर 1 हे माझ्या सोबतच होते. तेथे गेल्यानंतर मी पावरा साहेबांना "साइडला जावुया का? तुम्ही सांगितल्या प्रमाण जुळणी केली" असे म्हणालो तेव्हा ते हु.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "इथच मस्टर निघतायत ना?" असे विचारले तेव्हा पावरा साहेब यांनी हु.. असे म्हणाले व आधार कार्ड ही आणलय का? असे मला विचारले तेव्हा मी त्यांना "अं...नाय आणल विसरल" असे सांगीतले. तेव्हा त्यांनी "कोणाच नाव घ्यायच? मजुर म्हणुन कोण कोण हायेत तिथ.." असे मला विचारले. तेव्हा मी त्याना "मजुर हायती की.. आत्तार हाय अणि मुल्ला एक हाय." असे सांगीतले. त्यावर पावरा साहेब यांनी "पैसे दिले का त्यांना" असे मला विचारले. तेव्हा मी त्यांना "त्यांनी काढले नाहीत अजुन" असे सांगीतले. त्यावेळी मी पंचासह पावरा साहेब यांचे कक्षात गेलो. त्यावेळी माझ्यासोबत पंच नंबर 1 किशोर कुदळे हे उपस्थित होते. त्यानंतर पावरा साहेबांनी माझेशी घरकुलाच्या कामाबाबत चर्चा केली व "काढायला लावा की त्यांना हिशोब ठेवा बर का त्याचा" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना "हो हो ठेवतो" असे म्हणालो तेव्हा पावरा साहेब "नायतर काय होतय मस्टरचे पैसे कुठल्या कुठ जातायत आणि तुमच लक्ष नसलना चार पाच हजार रुपये सहज नुकसान होत तुमचं" असे मला म्हणाले. तेव्हा मी तर काय.. अहो एक एक व्यसनी माणसं भेटत्याती, ती सगळयासनी व्यसनी पन असत्याती खर्च करुन मोकळी होतात असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "खर्चुन मोकळे झाल्यावर कायच करु शकत नाय तुमी त्यांच, आल का लक्षात" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना "तर काय" असे म्हणालो. त्यानंतर पावरा साहेब यांनी त्यांचे टेबलच्या शेजारी डाव्या बाजुस असलेल्या बाकडयावर ठेवलेल्या काळ्या पिशवीकडे बोट दाखवुन "ठेवा इथ" असे मला सांगीतले. त्यावेळी मी पंच नंबर 1 कुदळे यांचेसमक्ष माझ्या पँटच्या उजव्या खिशातील अँथ्रासीन पावडर लावलेली 5000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढून पावरा साहेबांनी सांगीतलेप्रमाणे काळ्या पिशवीत ठेवली. तेव्हा पावरा साहेब हे कार्यालयाचे बाहेर आले. मी त्यांचे मागोमाग जावुन पावरा साहेबांना "होय ओ सर, साहेब" असे म्हणुन त्यांचे मागे कार्यालयाचे बाहेर आलो व माझा डावा हात डोक्यावर दोन वेळा फिरवुन सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा काही अंतरावर थांबलेल्या सापळा पथकातील पोहवा ताटे व पोशि थोरात यांनी पावरा साहेब यांना त्यांचे कक्षासमोरील मोकळ्या जागेत 12.42 वा चे सुमारास ताब्यात घेतले. तेव्हा पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पावरा साहेब यांना त्यांची ओळख सांगीतली व पुन्हा त्यांचे कक्षात घेवुन आले. त्यानंतर पो.नि. राऊत यांनी मला लाच रकमेबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना पावरा साहेब यांचे सांगणेनुसार काळ्या पिशवीत

लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगीतले त्यावेळी पोलीस निरीक्षक राऊत यांचे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी काळ्या रंगाचे पिशवीतुन 5000/- रुपये लाच रक्कम काढून स्वत:चे ताब्यात घेतली.
त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पावरा साहेबांचे कक्षातील लाईट व दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधार करुन त्यामध्ये अँथ्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व माझ्या हातांची, तसेच लाच रक्कम ठेवलेल्या काळ्या पिशवीची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली व सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, औंध येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी पंचायत समिती वडुज येथील शरण देविसिंग पावरा, व्य 43 वर्षे, विस्तार अधिकारी सांख्यिकी, पंचायत समिती खटाव (वडुज) यांनी माझे पत्नीचे नावे मंजुर झालेल्या घरकुलाचे 70,000/- रुपये शासकीय अनुदान मिळवुन दिले व पुढेही सदर कामात सहकार्य करतो असे म्हणुन दिनांक 21/07/2025 रोजी पडताळणी कारवाईवेळी माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रकमपैकी पहीला हप्ता म्हणुन 5000/- रुपये लाच रक्कम आज दिनांक 21/07/2025 रोजी सापळा कारवाई वेळी पंचायत समिती वडुज येथील पशुसंवर्धन विभागाचे ऑफिसमध्ये असलेल्या त्यांचे कक्षातील बाकडयावरील ठेवलेल्या काळ्या पिशवीत ठेवण्यास सांगुन स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Ghanshyam Babasaheb Sonawane(I (Inspector)) / API **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.** **(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.** **(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Muktar M. Bagwan.

**15. Date and time of dispatch to the court** **(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

[signature]

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Ghanshyam Babasa

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** API

ठाणे अंमलदार
वडूज पोलिस स्टेशन

**खबरी जबाब** **दिनांक २१/०७/२०२५**

मी मुख्तार मकबुल बागवान वय ५२ वर्षे, व्यवसाय - भाजी विक्री, रा. पुसेसावळी ता.खटाव जि.सातारा मोनं - ९१७५५०४७८८

मी दि. २१/०७/२०२५ रोजी सकाळी ०८.३७ वा. ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथील पोलीस निरीक्षक सचिन अंकुश राऊत यांना मोबाईल व्दारे फोन करुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली व मला सातारा येथे येणे शक्य नसल्याचे सांगीतले. तेव्हा पोलीस निरीक्षक सचिन राऊत यांनी वडुज येथे येवुन पुढील कारवाई करणार असल्याचे सांगुन मला वडुज पुसेगाव रोडवरील दिवाणी व फौजदारी कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत येवुन थांबण्यास सांगीतले. त्यानुसार मी तेथे येवुन थांबलो.

त्या नियोजनानुसार आज दि. २१/०७/२०२५ रोजी १०.३० वा.चे सुमारास वडुज पुसेगाव रोडवरील दिवाणी व फौजदारी कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत मी हजर असताना पोलीस निरीक्षक सचिन राऊत हे शासकीय वाहनातुन येवुन माझ्या जवळ येवुन थांबले. त्यावेळी त्यांनी माझी ओळख करुन घेऊन त्यांचे सोबत असलेले रहिमतपुर नगरपरिषद येथील किशोर बबन कुदळे, लिपीक व राजकुमार चंद्रकांत माने,स्वच्छता निरीक्षक या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा ताटे, पोशि देशमुख, थोरात यांची आम्हाला एकमेंकाना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून मी माझी पत्नी फरजाना व दोन मुले यांचे सोबत राहण्यास आहे. मी उदरनिर्वाहासाठी खटाव तालुक्यातील आठवडा बाजारात भाजीपाला विक्रीचे काम करत आहे. माझे शिक्षण १२ वी नापास झालेले आहे.

सन २०१७-२०१८ मध्ये पुसेसावळी गावातील प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेअंतर्गत घरकुलचा सर्व्हे झाला होता. सन २०२१-२०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये माझे पत्नीचे नाव प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून आले. सन २०२४-२०२५ मध्ये पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालय यांचेकडून दिनांक १७/०९/२०२४ रोजी माझ्या पत्नीचे नावे असलेल्या सिटी सर्व्हे नं. २८५ मध्ये घरकुल बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळाली व त्यानुसार दिनांक १५/१०/२०२४ रोजी माझ्या पत्नीचे खात्यावर घरकुल अनुदानाचा पहिला हप्ता १५,०००/- रु जमा झाला. त्यानंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती, वडुज यांचेकडील १८/०२/२०२५ रोजीचे आदेशाने माझी पत्नी फरजाना मुख्तार बागवान यांचे नावे कार्यारंभ आदेश दिले. त्यानुसार माझे घराचे काम सुरु केले. त्यानंतर दिनांक ०५/०७/२०२५ रोजी घरकुल अनुदानाचा दुसरा हप्ता माझे पत्नीचे खात्यावर ७०,०००/- रुपये जमा झाला.

त्यानंतर दिनांक ११/०७/२०२५ रोजी पुसेसावळी येथे आमच्या घरकुलच्या पाहणी करिता पंचायत समिती, वडुज येथील विस्तार अधिकारी, पावरा साहेब हे आले. त्यांनी मला पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेचा हप्ता आला का? असे विचारले तेव्हा मी त्यांना दुसरा हप्ता ७०,०००/- रुपये आला असल्याचे सांगितले. त्यावेळी पावरा साहेब यांनी मला मंजूर झालेल्या अनुदानाच्या दुसऱ्या हप्त्याचे व उर्वरित हप्ते जमा करायचे असेल तर मला १०,०००/- रु दयावे लागतील. ते काम माझ्या हातात आहे. असे म्हणून माझ्याकडे १०,०००/- रुपयाची मागणी केली. घरकुल अनुदान देण्याचे काम हे पावरा साहेब यांचेकडे असल्याचे मला माहित आहे. मी त्यांना त्यांचे मागणीप्रमाणे पैसे दिले नाहीत तर ते माझे उर्वरित हप्त्यांचे पैसे खात्यावर जमा करण्याचे काम करणार नाहीत म्हणून त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो.

त्यानंतर दिनांक १८/०७/२०२५ रोजी पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालयातील पावरा साहेबांचा मला फोन आला व त्यांनी पैशाबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना अजून पैसे काढले नाहीत. पैसे काढल्यानंतर तुम्हाला भेटतो असे म्हणालो त्यावेळी त्यांनी सोमवार दि. २१/०७/२०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय, वडुज येथे पैसे घेवून या असे म्हणाले. त्यावेळी मला पावरा साहेब हे माझ्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल अनुदानाच्या सोडलेल्या ७०,०००/- रु. चा हप्त्यासाठी तसेच पुढील अनुदानाचा हप्ता सोडणेसाठी माझ्याकडे मागणी करीत

असलेले १०,०००/- रु ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. ती लाच रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नाही.

मी आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी पंचायत समिती, खटाव (वडुज) कार्यालयातील पावरा साहेब यांची पंचायत समिती, खटाव (वडुज) येथे जावून त्यांची भेट घेवून त्यांचेशी लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. तरी त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.

माझेत व पंचायत समिती कार्यालय, वडुज येथील पावरा साहेब यांचेत कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत अगर पुर्ववैमनस्य नाही. वगैरे मजकुराची माझे हस्ताक्षरातील तक्रार पोलीस निरीक्षक राऊत यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाचून बघितीली व त्यावर सह्या केल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत यांनी पावरा साहेब, विस्तार अधिकारी, पंचायत समिती वडुज ता.खटाव जि.सातारा यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचांसमक्ष निर्णय घेतला. पंच नंबर १ म्हणुन किशोर कुदळे व पंच नंबर २ म्हणुन राजकुमार माने यांनी काम करण्याचे ठरविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला माझेकडे लाच मागणी होत आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व.प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे व पंचाचे निवेदन घेवुन माझे शर्टचे आतील बनियानला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर लावून दिले व तेथून ११.२० वाचे सुमारास मला पंच नंबर १ किशोर कुदळे यांचेसोबत पायी वडुज कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेतुन पंचायत समिती वडुज येथील पावरा साहेब यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक राऊत साहेब व त्यांचे सहकारी वडुज कोर्टाचे समोरील मोकळ्या जागेत थांबून राहिले.

मी व पंच नंबर १ किशोर कुदळे असे पंचायत समिती वडुज येथे गेलो असता प्रधानमंत्री आवास योजना ऑफिसमध्ये माझी व पावरा साहेब यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना "नमस्कार पावरा साहेब" असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब केल का सुरु असे म्हणाले तेव्हा मी बांधकाम केल सुरु असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेबांनी मला फोटो आणले का? असे विचारले. तेव्हा मी त्यांना फोटो नाय आणले... कामगार आलेती... मी म्हटलं.. तुम्ही त्या दिवशी बोलवल होत.. गुरवारी येवुन गेलो..गुरवारी काय आपण असे सांगीतले. त्यावर ते हु. असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी माझ्याशी कामाबाबत चर्चा केली व ते तेथुन उठुन माझ्यासोबत चालत पशुसंवर्धन ऑफिसमध्ये गेले मी ही पंचासोबत त्यांचेबरोबर चालत पशुसंवर्धन विभागातील त्यांचे कक्षात गेलो. तेव्हा पावरा साहेब खुर्चीत बसले मी त्यांचे समोर उभा राहीलो. तेव्हा पावरा साहेब मला फोनवर चर्चा करता येत नाही असे असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना हो फोनवर कशी चर्चा करणार असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना पैशाचा विषय आहे.. आणि पैशाचा विषय फोनवर बोलता येत नाही असे म्हणालो व "ती कस झालवतं.. अं.. तुमच्या सहकार्याने झालय ती काम" असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना **"दोन्ही हफ्ते आलेती .. तर ती म्हटलं..चर्चा करण्यासाठीच.." असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेबांनी मला "आता किती आणलेती?" असे विचारले तेव्हा मी त्यांना "आत्ता म्हणजे.. तुम्ही म्हटला होता.. चर्चा करायला या.. ती कसय.. आता सत्तर आलेत तुम्हाला त्यातले किती दयायचे?" असे विचारले तेव्हा पावरा साहेब "दहा" म्हणाले. तेव्हा मी त्यांना "दहा दयायचे .. मग आता दहा म्हणजे त्यातले... कमी जास्त करायचे काय.. ॲडजस्ट दोन हफ्त्यात देतो की.". असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "चालतय की.. नाय काय अडचन" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आठ दिवसाने देतो बाकीचे काय राहिलेले" असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "चालेल चालेल.. तुमच्या हेच्याने.. आम्ही जबरदस्ती करत नाही.." असे म्हणाले.** तेव्हा मी त्यांना मी आहो.. तुम्ही सहकार्य केलय आम्हाला असे म्हणालो. त्यानंतर मी व पावरा साहेब यांनी आपसात माझ्या घराच्या बांधकामाबाबत चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना "आल का लक्षात.. आता ती कसय.. फरजाना मुख्तार बागवान नावाने ते हे ... हाय.. येत आहे की नाय.." असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब हु. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना लेडीज नावाने येतय त्यामुळ प्रॉब्लेम येतोय..

कुणीकडण तरी ॲडजस्ट करुन ..असे म्हणालो व मी तुम्हाला देणार.. तुम्ही हाय ना इथ आज ? असे म्हणालो. तेव्हा पावरा साहेब हाय की.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना येवु का? गोळा करुन असे म्हणालो तेव्हा त्यांनी हु. चालतय.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना **"पाच देतोय आज.. पुढच्या आठवडयात पाच देतो.. अन नंतरचे कसे काय करायच.."** असे विचारले तेव्हा त्यांनी मला **"बघु आपण..**तुमच जोपर्यंत घर होत नाही तोपर्यंत मी हाय" असे मला म्हणाले. त्यानंतर मी त्यांचेशी चर्चा करुन "येतो मी" असे म्हणालो. त्यानंतर मी पंच नं १ चालत वडुज कोर्टाचे समोरील मोकळया जागेत ११.३६ वा.चे सुमारास परत आलो.

तेव्हा पो.नि.राऊत साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोनि राऊत साहेब व पंचांनी माझ्याक्रडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली की, पावरा साहेब यांनी माझे पत्नीचे नावे असलेल्या घरकुलाचे ७०,०००/- रुपये मंजुर केलेल्या मोबदल्यात माझ्याकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली व त्याचा पहीला हप्ता म्हणुन ५०००/- रुपये लाच रक्कम घेवुन येणेस सांगीतले आहे. तसेच पावरा साहेब यांनी माझ्याकडेस केलेल्या लाच मागणीवेळी पंच नंबर १ किशोर कुदळे हे माझ्यासोबतच होते व त्यांनी माझी व पावरा साहेब यांचेत झालेली चर्चा ऐकली असुन पावरा साहेब यांनी माझ्याकडे केलेली लाच मागणी ऐकली आहे. त्यानंतर सापळा कारवाई करण्याचे पंचांचे सहमतीने ठरविण्यात आले.

त्यानंतर मी पोनि राऊत साहेब यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली ५,०००/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहून घेतले. त्यावर पंचानी व राऊत साहेब यांनी सही केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी ॲंथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक राऊत साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांचे सुचनेवरून पोशि देशमुख यांनी ॲंथ्रासिन पावडर लावली व सदरची ॲंथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही माझे पॅंटच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व पावरा साहेब यांना लाच रक्कम दिल्या नंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन इशारा करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी मला दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे व पंचाचे निवेदन घेवुन व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टच आतील बनियानला लावून मला पंच नं १ यांचे सोबत पंचायत समिती वडुज येथे १२.३४ वाचे सुमारास रवाना केले. आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक राऊत साहेब व सापळा पथक व पंच नंबर २ हे पायी चालत आले. तेव्हा मी पंच नंबर १ कुदळे यांचे सोबत पंचायत समिती. वडुज येथे गेलो तेव्हा पावरा साहेब हे प्रधानमंत्री आवास योजना आफिसमध्ये होते. तेव्हा मी त्यांना "पावरा साहेब कुठ साईडला जावुया का?" असे विचारले असता ते तेथुन बाहेर आले. तेव्हा मी त्यांचेसोबत पुन्हा पशुसंवर्धन ऑफिस कडे जात असताना पंच नंबर १ हे माझ्या सोबतच होते. तेथे गेल्यानंतर मी पावरा साहेबांना "साइडला जावुया का? तुम्ही सांगितल्या प्रमाण जुळणी केली" असे म्हणालो तेव्हा ते हु.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "इथच मस्टर निघतायत ना?" असे विचारले तेव्हा पावरा साहेब यांनी हु.. असे म्हणाले व आधार कार्ड ही आणलय का? असे मला विचारले तेव्हा मी त्यांना "अं...नाय आणल विसरल" असे सांगीतले. तेव्हा त्यांनी "कोणाच नाव घ्यायच? मजुर म्हणुन कोण कोण हायेत तिथ.." असे मला विचारले. तेव्हा मी त्याना "मजुर हायती की.. आत्तार हाय अणि मुल्ला एक हाय." असे सांगीतले. त्यावर पावरा साहेब यांनी "पैसे दिले का त्यांना" असे मला विचारले. तेव्हा मी त्यांना "त्यांनी काढले नाहीत अजुन" असे सांगीतले. त्यावेळी मी पंचासह पावरा साहेब यांचे कक्षात गेलो. त्यांवेळी माझ्यासोबत पंच नंबर १ किशोर कुदळे हे उपस्थित होते. त्यानंतर पावरा साहेबांनी माझेशी घरकुलाच्या कामाबाबत चर्चा केली व "काढायला लावा की त्यांना

हिशोब ठेवा बर का त्याचा" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना "हो हो ठेवतो" असे म्हणालो तेव्हा पावरा साहेब "नायतर काय होतय मस्टरचे पैसे कुठल्या कुठ जातायत आणि तुमच लक्ष नसलना चार पाच हजार रुपये सहज नुकसान होत तुमचं" असे मला म्हणाले. तेव्हा मी तर काय.. अहो एक एक व्यसनी माणसं भेटत्याती, ती सगळयासनी व्यसनी पन असत्याती खर्च करुन मोकळी होतात असे म्हणालो. त्यावर पावरा साहेब "खर्चुन मोकळे झाल्यावर कायच करु शकत नाय तुमी त्यांच, आल का लक्षात" असे म्हणाले तेव्हा मी त्यांना "तर काय" असे म्हणालो. त्यांनतर पावरा साहेब यांनी त्यांचे टेबलच्या शेजारी डाव्या बाजुस असलेल्या बाकडयावर ठेवलेल्या काळ्या पिशवीकडे बोट दाखवुन "ठेवा इथं" असे मला सांगीतले. त्यावेळी मी पंच नंबर १ कुदळे यांचेसमक्ष माझ्या पँटच्या उजव्या खिशातील अँथ्रासीन पावडर लावलेली ५०००/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढून पावरा साहेबांनी सांगीतलेप्रमाणे काळ्या पिशवीत ठेवली. तेव्हा पावरा साहेब हे कार्यालयाचे बाहेर आले. मी त्यांचे मागोमाग जावुन पावरा साहेबांना "होय ओ सर, साहेब" असे म्हणुन त्यांचे मागे कार्यालयाचे बाहेर आलो व. माझा डावा हात डोक्यावर दोन वेळा फिरवुन सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा काही अंतरावर थांबलेल्या सापळा पथकातील पोहवा ताटे व पोशि थोरात यांनी पावरा साहेब यांना त्यांचे कक्षासमोरील मोकळ्या जागेत १२.४२ वा चे सुमारास ताब्यात घेतले. तेव्हा पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पावरा साहेब यांना त्यांची ओळख सांगीतली व पुन्हा त्यांचे कक्षात घेवुन आले. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला लाच रकमेबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना पावरा साहेब यांचे सांगणेनुसार काळ्या पिशवीत लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगीतले त्यावेळी पोलीस निरीक्षक राऊत यांचे सुचनेवरून पंच नंबर २ यांनी काळ्या रंगाचे पिशवीतुन ५०००/- रुपये लाच रक्कम काढून स्वतःचे ताब्यात घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी पावरा साहेबांचे कक्षातील लाईट व दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधार करुन त्यामध्ये अँथ्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व माझ्या हातांची, तसेच लाच रक्कम ठेवलेल्या काळ्या पिशवीची अ‍ॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली व सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पोलीस निरीक्षक राऊत साहेब यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, औंध येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी पंचायत समिती वडुज येथील शरण देविसिंग पावरा, वय ४३ वर्षे, विस्तार अधिकारी सांख्यिकी, पंचायत समिती खटाव (वडुज) यांनी माझे पत्नीचे नावे मंजुर झालेल्या घरकुलाचे ७०,०००/- रुपये शासकीय अनुदान मिळवुन दिले व पुढेही सदर कामात सहकार्य करतो असे म्हणुन दिनांक २१/०७/२०२५ रोजी पडताळणी कारवाईवेळी माझ्याकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रकमपैकी पहीला हप्ता म्हणुन ५०००/- रुपये लाच रक्कम आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी सापळा कारवाई वेळी पंचायत समिती वडुज येथील पशुसंवर्धन विभागाचे ऑफिसमध्ये असलेल्या त्यांचे कक्षातील बाकडयावरील ठेवलेल्या काळ्या पिशवीत ठेवण्यास सांगुन स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

[signature] २१/७/२५

ठाणे अंमलदार
वडूज पोलिस स्टेशन

हा खबरी जबाब दिला.

Mukhtar M. Bagwan